**ठळक बातम्या**

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा संपन्न /दोन्ही सभागृहांचं कामकाज येत्या ९ मार्चपर्यंत स्थगित

- लोकसभेत राहुल गांधी यांच्याविरोधात हक्कभंग ठराव सरकार आणणार नाही, निशिकांत दुबे यांच्या ठरावावर सभापतींशी चर्चा करुन निर्णय घेणार

- रेडियो दिनानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रम

- मुंबई विद्यापीठात जुन्या अभ्यासक्रमांच्या ३०४ परीक्षा बंद

**आणि**

- माजी केंद्रीय कृषी राज्यमंत्री आणि रेल्वेमंत्री कान्हू चरण लेंका यांचं निधन

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्याच्या कामकाजाचा आज अखेरचा दिवस होता. आजच्या शेवटच्या दिवशीही लोकसभेत विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून गदारोळ केल्याने कामकाज स्थगित करण्यात आलं असून दुसऱ्या टप्प्याचं कामकाज ९ मार्चला सुरू होणार आहे.

लोकसभेत आज सकाळी कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा पीठासीन अधिकारी संध्या राय यांनी माजी खासदार दिवंगत भगवानदास राठोड यांच्या निधनाचा शोकप्रस्ताव मांडला. त्यानंतर सभागृहात दोन मिनिटांचं मौन पाळून राठोड यांना आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात झाली. त्यानंतर काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, डीएमके सह अन्य विरोधी पक्षाच्या सदस्यांनी गदारोळ केल्याने कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित झालं. कामकाजाला पुन्हा सुरुवात झाल्यावरही गदारोळ सुरुच राहिल्यानं पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहाचं कामकाज ९ मार्चपर्यंत स्थगित केलं.

**राज्यसभेतही** अर्थसंकल्पीय अधिवेशनच्या पहिल्या सत्राच्या अखेरच्या दिवशी सदस्यांनी विविध दस्तऐवज सभागृहाच्या पटलावर मांडली. राज्यसभेचे अध्यक्ष उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी राष्ट्रपतींचा संदेश सभागृहात वाचून दाखवला. २८ जानेवारी रोजी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त अधिवेशनात केलेल्या अभिभाषणाबद्दल राज्यसभेच्या सदस्यांनी व्यक्त केलेल्या आभारदर्शक प्रस्तावाची नोंद राष्ट्रपतींनी घेतल्याचं संदेशात नमूद केलं. त्यानंतर राज्यसभेचंही कामकाज ९ मार्चपर्यंत तहकूब करण्यात आलं.

देशातल्या शेतकऱ्यांच्या एकूण एक समस्यांवर तोडगा काढण्यासाठी केंद्रसरकार सातत्याने प्रयत्न करीत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी राज्यसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना केलं. शेतकऱ्यांसाठी कृषी पायाभूत सुविधा निधी स्थापन करण्यात आला असून ४४ हजार २४३ शेती सामुग्री केंद्र, २५ हजार ८५४ प्राथमिक प्रक्रीया केंद्र, १७ हजारापेक्षा जास्त गोदामं, आणि सुमारे ३ हजार शीतगृह उभारण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली. या मुळे उत्पादनोत्तर नुकसानीचं प्रमाण ५ ते १५ टक्क्यांनी कमी झालं असल्याचं त्यांनी सांगितलं. कडधान्य, डाळी उत्पादनात आत्मनिर्भरता गाठण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे असं ते म्हणाले.

**<><><><><>**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी मांडलेला वेगळा ठरावावर सभापतींशी चर्चा केल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती, केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी आज बातमीदारांना दिली. हा ठराव विशेषाधिकार समितीकडे पाठवायचा की नितीमूल्य समितीकडे द्यायचा की थेट सभागृहात चर्चेसाठी आणायचा याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असंही रिजिजू यांनी सांगितलं.

**<><><><><>**

लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी विविध शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींची आज संसदभवन परिसरात भेट घेतली. या भेटीत अमेरिकेबरोबरच्या व्यापारिक कराराला विरोध करण्यासाठी तसंच शेतकरी आणि शेतमजूरांच्या सुरक्षेबाबत राष्ट्रीय पातळीवर आंदोलन करण्याबाबत चर्चा झाली.

अमेरिकेबरोबर केल्या जाणाऱ्या व्यापार करारामुळे देशात परदेशी कृषी माल आयातीला परवानगी दिली असून याचा भारतीय कृषी उद्योगावर विपरीत परिणाम होणार असल्याचं राहुल गांधी यांनी यावेळी सांगितलं. अमेरिका-भारत यांच्यात कृषी क्षेत्राबाबतच्या कराराला शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींनीही तीव्र विरोध दर्शवला आहे. सरकारच्या या निर्णयाविरोधात तसंच शेतकरी आणि शेतमजुरांची उपजीविका आणि सुरक्षेकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर मोठं आंदोलन करण्याबाबत चर्चा झाली.

**<><><><><>**

केवळ आवाजाच्या माध्यमातून जग जोडणाऱ्या प्रसारण कर्मींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी १३ फेब्रुवारी हा दिवस दरवर्षी रेडियो दिवस म्हणून साजरा केला जातो. स्पॅनिश रेडियो अकादमीच्या विनंतीवरुन नोव्हेंबर २०११ मधे युनेस्कोने हा निर्णय घेतला, आणि डिसेंबर २०१२मधे संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने त्यावर मोहोर उमटवली. कृत्रिम बुद्धिमत्तेचा या माध्यमातला वापर हे साधन राहील, ते मानवी आवाजाची जागा घेऊ शकणार नाही अशी यंदाच्या रेडियो दिनाची संकल्पना आहे. सार्वजनिक प्रसारण सेवेत ज्ञान, माहिती आणि मनोरंजनाचं माध्यम म्हणून आकाशवाणी गेली अनेक वर्ष चोख कामगिरी बजावत आहे.

आकाशवाणीच्या वतीने छत्तीसगडमध्ये रायपूर इथं आज जागतिक रेडिओ दिन परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं आहे.

आकाशवाणी मुंबईच्या सभागृहात व्हॉक्स अँड व्हाईब्ज हा पाश्चात्य संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर इथले रेडिओ प्रेमी संजय पवार यांनी आज रेडिओ प्रदर्शन आयोजित केलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रेडिओ दिना निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. रेडिओ हे दूरदूरच्या गावांपासून शहरांतल्या लोकांपर्यंत आवाज पोहचवण्याचं माध्यम असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

मुंबई विद्यापीठाने जुन्या अभ्यासक्रमांच्या ३०४ परीक्षा बंद केल्या आहेत. मागील दोन ते तीन शैक्षणिक वर्षापासून ज्या अभ्यासक्रमांना कोणत्याही विद्यार्थ्यांने नोंदणी केली नाही, अशा १२५ परीक्षा आणि ज्या अभ्यासक्रमांचा कालावधी १० वर्षे पूर्ण झालेला आहे अशा १७९ परीक्षांचा यात समावेश आहे. या परीक्षांचा तपशील १० फेब्रुवारीच्या परिपत्रकात परिशिष्ट १ आणि २ मध्ये देण्यात आला असल्याचं परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

<><><><><>

चंद्रपूर जिल्ह्यातल्या ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्राजवळ प्रस्तावित लोहारडोंगरी खाण प्रकल्पाला सर्वांचाच विरोध असल्याचं भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटलं आहे. पर्यावरणाला किमान हानी पोचेल अशा पद्धतीने हा खाण प्रकल्प राबवण्यासाठी राज्य वन्यजीव मंडळाने परवानगी दिली असली तरी यासंबंधी अंतिम निर्णय उच्च न्यायालयच घेईल असं मुनगंटीवार यांनी म्हटलं आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे राज्यसरकार या प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवणार नाही असं त्यांनी सांगितलं आहे.

<><><><><>

येत्या ५ वर्षांमध्ये भारतात आणखी ५० विमानतळ उभे राहतील शिवाय बांधकाम क्षेत्रातही मोठ्या संधी उपलब्ध होणार असल्याचं नागरी विमान वाहतूक मंत्री के राममोहन रेड्डी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत नारेडको ने आयोजित केलेल्या राष्ट्रीय शहरी आणि बांधकाम विकास परिषद २०२६ मध्ये ते आज बोलत होते. विमान वाहतुकीच्या सुरक्षेबाबत तडजोड न करता विमानतळांजवळच्या इमारतींच्या उंचीवरचे निर्बंध बदलण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज कोलंबो इथं ब गटातल्या सामन्यात झिम्बाब्वेनं ऑस्ट्रेलियावर २३ धावांनी मात केली. प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेनं २० षटकात २ गडी गमावून १६९ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा डाव ३ चेंडू बाकी असतानाच १४६ धावांवर आटोपला.

ड गटात आज कॅनडा विरुद्ध युएई हा सामना नवी दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर होत आहे. कॅनडानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला.

चेन्नईत अ गटात अमेरिका आणि नेदरलँड यांच्यात सामना होणार असून खेळ संध्याकाळी ७ वाजता सुरु होईल.

**<><><><><>**

थायलंमध्ये बँकॉक इथे सुरू होणाऱ्या महिलांच्या आशिया चषक रायझिंग स्टार्स क्रिकेट स्पर्धेत भारताचा अ संघ सहभागी होणार आहे. या स्पर्धेत आठ संघ सहभागी होणार असून ते दोन गटात विभागण्यात आले आहेत. प्रत्येक गटातला संघ एकमेकांबरोबर एकदा सामना खेळेल. दोन्ही गटातले अव्वल दोन संघ उपांत्य

फेरीत पोहोचतील. आज या स्पर्धेचा पहिला सामना नेपाळ आणि पाकिस्तान दरम्यान होईल.

<><><><><>

माजी केंद्रीय कृषी राज्यमंत्री आणि रेल्वेमंत्री कान्हू चरण लेंका यांचं आज सकाळी भुवनेश्वर इथं निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. कान्हू चरण लेंका यांनी १९८८ ते १९९४ पर्यंत राज्यसभेत ओडिशाचं प्रतिनिधित्व केलं होतं. चौद्वार मतदारसंघातून ते चार वेळा ओडिशाच्या विधानसभेवर निवडून आले होते. तसंच ओडिशाच्या प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलं होतं.

<><><><><>

नांदेडमध्ये नांदेड - नागपूर राष्ट्रीय महामार्ग ३६१ वर अपघाताच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्यानं, नागरिकांनी आज चक्का जाम आंदोलन केलं. या आंदोलनामुळे या मार्गांवरील वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली होती.

//<><><><><>//